या परिसंवादाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर नाट्य परिषदेच्या अमेरिका शाखेचा व स्थानिक कलावंताचा गावरहाटी हा कार्यक्रम व व्यावसायिक कलाकारांचा सहभाग असलेला कलाकार रजनी कार्यक्रम सादर करण्यात आला.

त्याचवेळी, नाईक मोचेमाडकर दशावतारी मंडळ यांचा दशावतार, तसेच स्नेह, सावंतवाडी यांची 'रसिक', नाट्य परिषद अकोला शाखा यांची 'अखेरचा सुड' नाट्य परिषद सोलापूर शाखेची 'तो एक वेडा माणूस', अभिनय नागपूरची 'काही स्वप्ने पुसायची असतात', नाट्य परिषद धुळे शाखेचे, 'अहिराणी भाषेतील एकांकिका', नाट्य परिषद अहमदनगर शाखा यांची 'सूडचक्र' नाट्य परिषद जळगाव शाखेची 'पत्रावली' आणि अक्षरसिंधु कलामंच, कणकवली यांची 'गावय' या एकांकिका रघुवीर तळाशीलकर नाट्यमंचावर सादर करण्यात आल्या.

बाबी नालंग मुक्तमंचा वर 'हास्यदरबार', 'हनुमंताचो बारसा', 'हास्यपंचमी' 'कुटुंब रंगलय काव्यात', 'हास्यशाही', 'मीठी मिठी सर्वांसाठी', 'काव्य, नाट्य जगावे कसे?', 'कथा कथान', 'रंगात रंगला श्रीरंग', 'नाटयस्वगत', 'कथारंग' हे एकपात्री कार्यक्रम तसेच 'आडदशावतार' सादर करण्यात आला.

चिं.त्र्यं. खानोलकर रंगमंचावर 'रंगभूमीची चळवळ वृध्दींगत होण्यासाठी माध्यमांची जबाबदारी' हा परिसंवादाचा कार्यक्रम व त्यानंतर संमेलनाध्यक्षा श्रीमती लालन सारंग यांचे भाषण व चर्चेचा कार्यक्रम झाला. यानंतर राजापूर येथील बालकलाकारांची गाणी, बाल एकांकिका 'ओसामा', नाट्य परिषद अहमदनगर शाखेची 'घर देता का घर', नाशिक शाखेची 'एक झाड जे फक्त नाहीच म्हणायचे', मिरज शाखेची 'बंद चॅनल' या बाल एकांकिका, तसेच बेळगाव येथील 'अवघे धरु सुपंथ', कणकवली येथील 'मालवणी दशावतार' इत्यादि एकांकिका सादर करण्यात आला.

चार्ली चॅपलीन फिल्म फेस्टीवल आणि स्थानिक बालरंगभूमीवरील कार्यकर्त्यांची कार्यशाळा, 'देणे गंधर्वाचे' हा नाट्य संगीताचा कार्यक्रम मामा वरेरकर रंगमंचावर सादर करण्यात आला.

## रविवार दिनांक २९ एप्रिल २००७

कमलाकर सारंग रंगमंचावर 'कोकणातल्या कलावंतांचे या भूमीसाठी योगदान काय?' तसेच 'आमची पंच्याहत्तरी' या परिसंवादाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

बाबी नालंग मुक्तमंचावर 'एकपात्री', 'तबलावादन', 'स्वच्छता अभियान', 'नाटिका', 'कलमठ बालचमुचा कार्यक्रम', 'कळसूची बाहुल्या', 'गंध कोकणच्या मातीचा', 'दशावतार' इत्यादि कार्यक्रम सादर करण्यात आले.

चिं.त्र्यं. खानोलकर रंगमंचावर 'आम्ही मोठे होणार' हा लहान मुलांच्या गाण्याचा कार्यक्रम तसेच बालकलाकारांच्या नाटयछटांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

"बालरंगभूमी चळवळ आज व उद्या", 'आम्ही ही थिएटर करता जरा इकडे लक्ष द्या', "उद्याचा प्रेक्षक घडविण्यासाठी मी काय करु शकतो?" हे परिसंवाद मामा वरेरकर रंगमंचावर सादर करण्यात आले.